**पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ १**
**पिंपरी चिंचवड आयुक्तालय**
**पिंपरी चिंचवड, पुणे, महाराष्ट्र ४११ ०३३**
**सांगवी पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड शहर**

# प्रेसनोट दिनांक १४/०९/२०२३.

## सांगवी पोलीस स्टेशन यांनी सराईत गुन्हेगाराकडुन ०१ देशी बनावटीचे पिस्टल,०२ जिवंत काडतुसे व एक मोटार सायकल जप्त केले बाबत

मा.पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी पिंपरी चिंचवड शहरामध्ये अवैध्यरित्या शस्त्रे बाळगणाऱ्या गुन्हेगाराचा शोध घेवुन त्यांचेविरुध्द कडक कारवाई करणेबाबतचे आदेश दिले होते.त्याअनुशंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक मा.श्री.श्रीराम पौळ,सांगवी पोलीस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथका कडील पोलीस उप निरीक्षक एम.डी.वरुडे व तपास पथकातील अंमलदार हे अवैध शस्त्र बाळगणारे गुन्हेगार यांची माहिती घेत होते.

दिनांक १३/०९/२०२३ पोलीस उप निरीक्षक एम.डी.वरुडे,पो.ना.११९४ गायकवाड, पोना.१५३४ पाटील, पोना/१५३५ विजय मोरे.पो.ना १५१२ गोडे,पोकॉ २२०९ डंगारे, पो हवा ९४८ साळवे,पोहवा ८५९ संजय डामसे ,असे गणपतीसणाच्या निमीत्त सांगवी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असताना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, साठ फुटी रोड, पिपळे गुरव पुणे येथे एका काळया रंगाच्या पॅशन मोटार सायकल वरुन तिन इसम पिस्टल घेवुन येणार आहेत. अशी बातमी मिळालेने सदर बातमीची माहीती वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री श्रीराम पौळ यांना कळविली त्यांनी सदर ठिकाणी जावुन बातमी प्रमाणे कारवाई करुन घेणे बाबत मौखिक आदेशित केले. पोलीस उप निरीक्षक एम.डी वरुडे व तपास पथक टिम असे सानवी पान शॉपचे समोर पिंपळे गुरव पुणे येथे सापळा लावुन थांबले असता २०.३० वा चे सुमारास तेथे एक काळे रंगाची पॅशन गाडीवरुन ट्रिपल सिट मुले येताना दिसली तेव्हा त्यांना ताब्यात घेऊन त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांची नावे १) **विघ्नेश गुणशिलंन रंगम वय २४ वर्षे रा. कृष्णाई निवास गंगोत्रिनगर लेन नं २ पिंपळे गुरव पुणे. २) अक्षय राजेश खुडे वय २५ रा.पंचशिल चौक मुंजाबा वस्ती धानोरी पुणे, ३) नागेश मल्लप्पा कांबळे वय २० वर्षे रा.मोजे शाळेचे समोर मुंजाबा वस्ती धानोरी पुणे** असे सांगितले तेव्हा त्यांची अंगझडती घेतली असता **त्यांच्या ताब्यात ०१ देशी बनावटीचे पिस्टल स्ट्रिगर गार्ड,मॅगजिन असलेले पिस्टल व ०२ जिवंत रांऊड मिळुन आले आहेत**.सदर आरोपी यांना सांगवी पोलीस स्टेशन येथे आणुन अधिक चौकशी केली असता सदर आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन आरोपी क्र.१) विघ्नेश गुणशिलंन रंगम याचे विरुध्द सांगवी पोलीस स्टेशन गु.र.न.३५२/२०२२ भा.द.वि.क ३९२,३०८,४२७,३४, आणि गु.र.न.३५३/२०२२ भा.द.वि.क ३९२,३४,प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.तसेच आरोपी क्र.२) अक्षय राजेश खुडे याचे विरुध्द सांगवी पोलीस स्टेशन गु.र.न.२५९/२०१८ भा.द.वि.क ३०७,३२६,३२३,५०४,५०६ वगैरे प्रमाणे गुन्हे दाखल आहे.

मा.पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांचे कार्यालय दिनांक ०४/०९/२०२३ रोजीचे आदेशान्वये, पिंपरी चिंचवड शहरात पोलीस आयुक्तलय कार्यक्षेत्रात दिनांक ०५/०९/२०२३ रोजी ००.०१ ते दिनांक १८/०९/२०२३ रोजी २४:०० वा. पर्यंत महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) चे प्रतिबंधात्मक आदेश असताना सदर आदेशाचा भंग करुन, वरिल आरोपी यांनी स्वताच्या कब्ज्यात ०१ देशी बनावटीचे पिस्टल व ०२ जिवंत पितळी राऊंड कोणताही कायदेशीर परवाना नसताना अवैधरित्या बाळगले असताना मिळुन आले म्हणुन त्याचे विरुध्द सांगवी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर ४९३/२०२२३ भारतीय हत्यार कायदा कलम ३ (२५) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) सह १३५ सह मो.वा.का.क. १२८/१७७ ,३(१)१८१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन पुढील तपास पोलीस उपनिरिक्षक श्री.एम.डी.वरुडे सांगवी पोलीस स्टेशन हे करत आहे.

**सदरची कारवाई पिंपरी-चिंचवडचे मा.पोलीस आयुक्त, विनय कुमार चौबे साहेब मा. सह पोलीस आयुक्त, डॉ. संजय शिंदे साहेब,मा.अपर पोलीस आयुक्त श्री वंसत परदेशी साहेब मा.पोलीस उप आयुक्त श्री विवेक पाटील साहेब,सहा.पोलीस आयुक्त डॉ.विशाल हिरे साहेब चिचंवड विभाग,यांचे मार्गदर्शनाखाली सांगवी पोलीस स्टेशन कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.श्रीराम पौळ,पोलीस निरिक्षक (गुन्हे) श्री सुनिल तांबे तसेच तपास पथकाचे,पोलीस उप निरीक्षक एम.डी. वरुडे तसेच पोलीस अंमलदार,पो हवा ९४८ साळवे,पोहवा ८५९ डामसे पो.ना.११९४ गायकवाड, पो.ना १५१२ गोडे, पोना.१५३४ पाटील, पोना/१५३५ मोरे. पोकॉ २२०९ डंगारे यांचे पथकाने केली आहे.**

**(श्री.विवेक पाटील)**
**पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१**
**पिंपरी चिंचवड शहर**